विद्यार्थ्यांनी गिरवले व्यक्तिमत्त्व विकासाचे धडे

आंबिये महाविद्यालयात उन्हाळी शिबिर उत्साहात | शालेय विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त आणि भरघोस प्रतिसाद

टीम दैनिक हेराल्ड

विर्नोडा, दि. ९ : संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय विर्नोडा येथे उन्हाळी शिबिर समितीच्या वतीने उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आलेले होते. या पाच दिवसीय उन्हाळी शिबिरात विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला. शिवाय नवी कौशल्ये साध्य करत व्यक्तिमत्त्व विकासाचे धडेही गिरवले. क्रीडा, कला, व्यक्तिमत्त्व विकास, योग, नृत्य, संगीत, स्वयंपाक आणि सजावट यांसारख्या विविध क्षेत्रांमधील १२ संसाधन व्यक्तींच्या नेतृत्वाखाली विविध उपक्रम या उन्हाळी शिबिरात सादर करण्यात आले. स्थानिक समुदायातील विद्यार्थ्यांचा समग्र विकास, वाढ आणि शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे या उद्देशापोटी हे उन्हाळी शिबिर आयोजित करण्यात आलेले होते. या शिबिराचे मुख्य समन्वयक कॅप्टन सॅम ब्रागांझा, सहसमन्वयक प्रा. सिद्धी सागळे, दिव्या साळगावकर, चेरी जुवांव आदींनी या शिबिराच्या आयोजनात मुख्य भूमिका बजावली. या उन्हाळी शिबिरात परिसरातील १३ शाळांमधील ११३ विद्यार्थ्यांना सहभाग घेतला. मान्यवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन, खेळ आणि मनोरंजन आदींच्या उपयोजनामुळे हे शिबिर विद्यार्थ्यांसाठी लाभदायक ठरले.

शिक्षण आणि समाज यांच्यातील सहसंबंध अधिक दृढ करणे हा या शिबिराचा उद्देश होता. या उन्हाळी शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी नागझर येथे असलेल्या हिरार्म हाऊस येथे क्षेत्रीय सहल आयोजित करण्यात आलेली होती.

पेडणे : सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य जुवांव कोस्टा, कॅप्टन सॅम ब्रागांझा व इतर.

पान १ वरून

घर दुरुस्ती परवानगी प्रक्रिया सुलभ

जलसंपत्ती व्यवस्थापन आणि शाश्वत पर्यटन यासारख्या विषयांवर कार्य करेल. मुख्यमंत्र्यांनी 'विकसित गोवा' पोर्टलचे उद्घाटन केले असून, हे व्यासपीठ राज्याच्या सर्व नागरिकांसाठी खुले आहे. नागरिकांना विकसित गोवा व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यासाठी आपले अभिप्राय आणि सूचना सादर करण्याची संधी देण्यात आली आहे. क्यूआर कोडच्या माध्यमातून सूचना सादर करण्यासाठी २५ मे २०२५ पर्यंत ४५ दिवसांची मुदत देण्यात आली आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

महाविद्यालयांमध्ये प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया उद्यापासून

टीम दैनिक हेराल्ड

पर्वरी, दि. ९ : उच्च शिक्षण संचालनालय गोवा यांच्या अंतर्गत येणाऱ्या शासकीय आणि अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया उद्या दि. ११ एप्रिलपासून सकाळी ११ वाजता सुरू होणार असल्याची माहिती उच्च शिक्षण संचालनालयातील नोडल अधिकारी डॉ. महादेव गावस यांनी दिली.

यामध्ये बीए, बी.कॉम, बी.एससी, संगीत, थिएटर, गृहविज्ञान, व्होकेशनल, बीसीए, बीबीए, बीपीएड, बीएएलएलबी, बीएससी कृषी, एएनडब्लू आणि जीएनएम, बी.एससी इन स्पोर्ट्स सायन्स, बी.एससी डाटा सायन्स या शाखांचा समावेश असून या शाखांसाठी उमेदवार अर्ज करू शकतात, असेही डॉ. गावस यावेळी म्हणाले.

२०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षाची सर्व शाखांची प्रवेश प्रक्रिया ई समर्थ गव्हर्नन्स या संकेतस्थळाच्या माध्यमातून होणार आहे. प्रथम वर्षासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी हीींिि://वहश.सेर.सेीं.ळप/ या संकेतस्थळावरील माहिती काळजीपूर्वक वाचून अर्ज भरावेत, असे आवाहनही डॉ.गावस यांनी केले. ज्या महाविद्यालयांमध्ये बीबीए आणि बीसीए अभ्यासक्रम सुरू झालेला आहे, ती महाविद्यालये विद्यार्थ्यांची ऑफलाईन प्रवेश परीक्षा घेतील. बीए.एलएलबीसाठीची प्रवेश परीक्षा गोवा विद्यापीठ घेईल, असेही डॉ. गावस यांनी सांगितले.

विद्यार्थी ऑनलाईन अर्ज दि. ११ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजल्यापासून करू शकतात. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ३० एप्रिल आहे. ऑनलाईन अर्ज मोफत असून त्यासाठी कोणतीही फी आकारली जात नाही. याशिवाय ई माहितीपुस्तिका संबंधित महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

ऑनलाईन अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना एकावेळी पाच महाविद्यालयांना पसंतीक्रम देता येईल. शिवाय एकाचवेळी पाच शाखांसाठी अर्ज करता येईल. अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्याने ई समर्थ पोर्टलवर एकदाच नोंदणी करायची आहे. प्रत्येक महाविद्यालय स्वतंत्रपणे गुणवत्ता यादी तयार करणार असून विद्यार्थ्यांनी जागा निश्चित झाल्यानंतर प्रवेश शुल्क महाविद्यालयात भरावयाचे आहे. ऑनलाईन अर्ज भरताना विद्यार्थ्यांना कोणतही समस्या आल्यास संबंधित महाविद्यालये आणि उच्च शिक्षण संचालनालयाच्या कार्यालयात भेट द्यावी, असेही डॉ. गावस म्हणाले.

उच्च शिक्षण संचालनालय गोवा यांच्या अंतर्गत येणारी शासकीय आणि अनुदानित अशी ४० महाविद्यालय प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत सहभागी होणार असल्याची माहिती डॉ. महादेव गावस यांनी दिली.

CHANGE IN NAME

I **LIBAN FERNANDES** R/o, Hno-K-353, plot 64, Kadamba govt society kadamba plateau chimbel Tiswadi Goa, would like to change my name from **LIBAN D COSTA** TO **LIBAN FERNANDES** hereafter in all documents and dealing will be known by the name **LIBAN FERNANDES.**

OFFICE OF THE CIVIL REGISTRAR CUM SUB REGISTRAR SALCETE
Room No. 209, 2nd Floor, Mathany Saldanha Administrative Complex, Margao, Goa

No. CR / SR / SAL / 1666 / 2025 Date 02/04/2025

NOTICE

Office of the Civil Registrar cum Sub Registrar and Special Notary Salcete

Shri. Kiran Harish Mesta, Jt. Civil Registrar-cum-Sub Registrar I & II and Special Notary in the said Judicial Division of Salcete, Margao.

In accordance with Section 346(11) of the Goa Succession Special Notaries and Inventory Proceedings Act 2012 it is hereby made public that by Deed of Declaration of Heirship dated 24/03/2025 duly recorded under Book No. 1729 at page 62 to 64 of the office, the following is recorded:

That on Eighth day of the Month September in the year Two Hundred and Twenty Two died at Grace Intensive Cardiac Care Hospital, Margao, died Dinesh Naik alias Naik Dinesh Pandurang alias Dinesh Pandu Naik, expired inestate i.e. without leaving will or any other disposition of their last wish, without any children or descendents, leaving behind his wife Smt. Smita Dinesh Naik alias Panchal Sunita Yashwant, widow as his "sole and universal heirs". *there being no one else or no other person or heir who hr terms of Law of Succession in force in this State of Goa may prefer the estate left by the deceased persons.*

Any person having objection to this deed may file in this office within one month from the date of its publication.

Sd/- **Shri Kiran Harish Mesta** Seal
Special Notary and Jt. Civil Registrar cum Sub Registrar I & II, Salcete, Margao

IN THE COURT OF JOINT MAMLATDAR-VI OF BARDEZ TALUKA AT MAPUSA - GOA
Mutation Case No. 99797
village: Candolim

Maria Lourdina D'Souza, R/o. 1350/A, Muddo Vaddo, Candolim, S.O. Saipem, North Goa ..... Applicant

V/s

Communidade of Candolim through its Procurador With office opposite Church of Our Lady of Good Hope, Candolim Bardez Goa .... Opponent

PUBLIC NOTICE

To all opponents /legal heirs/any other interested parties

Whereas the applicant Maria Lourdina D'Souza, R/o. 1350/A, Muddo Vaddo, Candolim, S.O. Saipem, North Goa has applied for mutation under section 96 of L.R.C 1968 to include her name along with Rosy Dsouza and Diogo Jerome D'Souza in tenant column of Sy No.247/1 of Village Candolim as tenant as per Judgment and order dated 12-09-2023 in case No. JM-I/TNC/ SR/ Candolim/ 20/1999 passed in the court of the Joint Mamlatdar I of Bardez Taluka at Mapusa Goa.

And whereas the notices in Form No. X was sent to all the interested persons by registered A.D., however some of the notices could not be served and returned unserved to the sender with postal remark expired, incomplete address, house locked, not known, insufficient address and party out of station etc.

And whereas the applicant has prayed vide her application for substitute service, by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20(1A) of C.P.C as the applicants does not know the legal heirs and the address of the interested parties.

All the interested parties are hereby given notice of the said mutation entry and called upon to submit to me their objection if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notice failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the certifying Office.

Dated: 2.4.2025 Place: Mapusa
Sd/- (Saiesh S. Naik) SEAL
Joint Mamlatdatr-VI of Bardez Taluka Mapusa

CHANGE IN NAME

I **SURESH BHIMSING PAWAR** R/o, Hno-160/6, Mae de deus Sangolda Bardez Goa, would like to change my name from **SURESH BHIMASING PAWAR** TO **SURESH BHIMSING PAWAR**, hereafter in all documents and dealing will be known by the name **SURESH BHIMSING PAWAR.**

OFFICE OF VILLAGE PANCHAYAT OF VARCA SALCETE GOA
Ref. No. VP/VAR/2025-2026/ 45
Date: 08/04/2025

NOTICE

Sealed quotations are invited from the eligible Contractors/dealers for crane Services with bucket so as to undertake dangerous tree cutting/trimming on an hourly basis. The quotation should provide the hourly rates of said services.

The said services shall be made available within a period of 10 days from date of order. Tentative hours required will be provided to the supplier at the time of issue of order.

Quotations should reach this office on or before **15/04/2025 at 10:30 am** which will be opened on **15/04/2025 at 12:30 pm,** in the Panchayat Office in presence of V.P. members.

Sd/- (Flavia Baretto)
Sarpanch, V. P Varca Seal

युपीएससी परीक्षेविषयी आंबिये महाविद्यालयात मार्गदर्शन

टीआयपी सेलचा पुढाकार | विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

टीम दैनिक हेराल्ड

विर्नोडा, दि. ९ : संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय विर्नोडा येथील टीआयपी सेलने गोवा विद्यापीठातील विद्यार्थी प्लेसमेंट आणि माजी विद्यार्थी संबंध संचालनालयाच्या करिअर समुपदेशन सेलच्या सहकार्याने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी युपीएससी परीक्षेविषयी मार्गदर्शन आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केलेला होता. राज्यातून अधिकाधिक आएएस, आयपीएस आणि आयएफएस अधिकारी घडविणे हा या प्रशिक्षण कार्यक्रमाचा हेतू होता. त्यानिमित्ताने गोवा विद्यापीठातील विद्यार्थी प्लेसमेंट आणि माजी विद्यार्थी संबंध संचालनालयाच्या करिअर समुपदेशन सेलच्या टीमने रोजी महाविद्यालयाला भेट देऊन वेगवेगळ्या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जुवांव कोस्टा, गोवा विद्यापीठातील विद्यार्थी प्लेसमेंट आणि माजी विद्यार्थी संबंध संचालनालयाचे संचालक डॉ. रुपेश पात्रे, डॉ. संगीता देसाई, डॉ. आकृती अलर्नकर, आंबिये महाविद्यालयातील टीआयपी सेलच्या मुख्य समन्वयक डॉ. मृणाली जांबोटकर, डॉ. अक्षय साखळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

संचालक डॉ. रुपेश पात्रे यांनी विद्यार्थ्यांना युपीएससी परीक्षेचा उद्देश, दृष्टी आणि महत्त्व व राष्ट्र उभारणीतील भूमिका यासंदर्भात मार्गदर्शन केले. युपीएससी परीक्षा मार्गदर्शनच्या समन्वयक डॉ. संगीता देसाई यांनी प्राथमिक, मुख्य परीक्षा, मुलाखतीचे टप्पे, अभ्यासक्रमाचे विभाजन, प्रश्नांची पद्धत याचा आढावा घेतला. सहसमन्वयक डॉ. आकृती अलर्नकर यांनी विद्यार्थ्यांसाठी खुल्या प्रश्नोत्तर सत्राचे आयोजन केले. ज्यातून विद्यार्थ्यांनी स्वत:च्या मनातील प्रश्न विचारून उत्तरे मिळवली.

पेडणे : प्राचार्य डॉ. जुवांव कोस्टा, डॉ. रुपेश पात्रे व इतर.

१०३ विद्यार्थ्यांचा सहभाग

आंबिये महाविद्यालयातील टीआयपी सेलच्या मुख्य समन्वयक डॉ. मृणाली जांबोटकर यांनी विद्यार्थ्यांना या कार्यक्रमासाठी प्रोत्साहित केले. या कार्यक्रमात १०३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन युपीएससी परीक्षेविषयी मार्गदर्शन सत्राचा लाभ घेतला.

केनरा बैंक Canara Bank भारत सरकार का उपक्रम A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate

शाखा मडगाव
संपर्क तपशील : 0832 2703143, 7774005713
ईमल : cb0314@canarabank.com

विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 8(6) व 9 मधील तरतुदींखाली स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारे नोटीस देण्यात येते की, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या तरतुदींखाली ताबा घेतलेल्या खाली वर्णिलेल्या मालमत्ता जाहीर लिलावाने विकल्या जातील.

1. सुरक्षित धनकोकचे नाव : **कॅनरा बॅंक, मडगाव शाखा**

2. कर्जदार / हमीदाराचे नाव : **मेसर्स ग्लेझटेक सिस्टींम्स (कर्जदार)**, गाळा क्र. 34, तळमजला, फेलिसिटा कॉम्प्लेक्स, घोगळ, मडगाव, गोवा 403601., **श्री. विश्वेश पी. कामत** (भागीदार/ हमीदार), घर क्र. 860, गल्ली-2, विद्यानगर कॉलनी, सालसेत, मडगाव 403601, **श्रीमती आरती व्ही. कामत (हमीदार)**, घर क्र. 860, गल्ली-2, विद्यानगर कॉलनी, सालसेत, मडगाव 403601, **श्री. मार्क एच. फिगरेदो (भागीदार /हमीदार)**, फ्लॅट क्र. एस/1, लुसियन अपार्टमेंट, फातोर्डा, सालसेत, गोवा 403602, **श्रीमती मारिया सी. फिगरेदो (हमीदार)**, फ्लॅट क्र. एस/1, लुसियन अपार्टमेंट, फातोर्डा, सालसेत, गोवा 403602. **3.** दि. **31.03.2025** रोजी एकूण दायित्वे : रु. **7,45,50,080.04/-. (रु. सात कोटी पंचेचाळीस लाख पन्नास हजार ऐंशी व पैसे चार फक्त)** अधिक त्यापुढील व्याजचार्जेस व इतर खर्च, काही असल्यास. **4.** (अ) **लिलाव प्रणाली : ई-लिलाव (ऑनलाईन) (ब) लिलाव सेवा पुरवठादार तपशील : मे. पीएसबी अलायन्स (BBaanknet)**, संपर्क क्र. **8291220220, ईमेल आयडी : support.BAANKNET@psballiance.com**
(क) लिलाव तारीख व वेळ : 29.04.2025 वेळ : सकाळी 11.30 ते दु. 1.00 (3 स्लॉट्स) (विक्री पूर्ण होईपर्यंत प्रत्येकी **5** मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह) (ड) लिलावाचे ठिकाण - ऑनलाईन **https://baanknet.com/**

5. मालमत्ता, राखीव किंमत, ईएमडी व लिलाव वेळेचा तपशील

संच क्र. 1 : गोवा राज्याच्या तालुका व उपजिल्हा सालसेतच्या मडगाव नगरपालिका क्षेत्रात मडगाव शहराच्या घोगळ प्रभागात असलेल्या बामण गल्ली या नावाच्या मालमत्तेचा वेगळा केलेला भाग असलेल्या मडगाव, गोवाच्या शहर सर्वेक्षण कार्यालयात पीटी शीट क्र. 197 च्या चलता क्र. 71 खाली सर्वेक्षित 341 चौ.मी क्षेत्रफळाचा प्लॉट क्र. 24 जी मालमत्ता श्री. विश्वेश प्रकाश कामत यांच्या मालकीची असून क्र. 19739 खाली सर्वेक्षित आणि अनुक्रमे क्र. 1103, 1104 व 1102 खाली मडगाव च्या भू महसूल यादीत (मात्रिज प्रेडियल) नोंदवलेली आणि नवीन मालिकेच्या क्र. 10679, 26665 व 26770 खाली सर्व मडगाव येथील सालसेतच्या भू नोंदणी कार्यालयात (कॉन्झरव्हेटिया ओडी रेजियाटो प्रेडियल) नोंदवलेली असून एकास एक लागून असलेल्या तीन मालमत्ता मिळून झालेली एक मालमत्ता आहे.
राखीव किंमत : रु. 87,50,000 ईएमडी रक्कम : रु. 8,75,000, वेळ : सकाळी 11.30 ते दु. 1.00

संच क्र. 2 : श्री. मार्क एच. फिगरेदोव आठ इतरांच्या नावे असलेल्या एकूण 1490 चौ.मी. क्षेत्रफळाच्या वास्को द गामा शहर सर्वेक्षणाच्या पीटी शीट क्र. 126 ए च्या चलता क्र. 38, 39, 40, 41 खाली एकत्रपणे प्लॉट क्र. 18, 19 व 20 अशा तीन लहान प्लॉट्समध्ये विभागलेल्या **मोलो मोस्तीमांडो** या नावाची संपूर्ण मालमत्ता. 898 चौ.मी. क्षेत्रफळाच्या पीट शीट क्र. 126 ए च्या चलता क्र. 38 खाली सर्वेक्षित प्लॉट क्र. 18 वर बांधलेली इमारत. **मोलो मोस्तीमांडो** या नावाच्या क्षेत्रात असलेल्या गोवा राज्याच्या दक्षिण जिल्ह्यातील चिखली मुरगाव तालुक्यात प्राईम मोनार्च को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी इमारतीत 100 चौ.मी. क्षत्रफळाचा फ्लॅट क्र. एफ-3 (नोंदणी क्र. एचएसजी(बी)-759/एसजी/2010 दि. 03/05/2010)
राखीव किंमत : रु. 41,10,000,, ईएमडी र्ककम : रु. 4,11,000, वेळ : दुपारी 12.00 ते 12.30

संच क्र. 3 : मे. ग्लेझटेक सिस्टीम्स यांच्या मालकीचा कुंकळ्ळीच्या सर्व्हे क्र. 317 खाली सर्वेक्षित आणि गोवा राज्याच्या दक्षिण गोवा जिल्ह्यात तालुका व उपजिल्हा सालसेतच्या कुंकळ्ळी नगरपालिका क्षेत्रात कुंकळ्ळी येथील कुंकळ्ळी औद्योगिक वसाहतीत त्यावर बांधलेल्या अदमासे 938.76 चौ.मी. बिल्ट अप क्षेत्रफळ असलेल्या (बेसमेंट मजला, 219.96 चौ.मी., तळमजला 498.84 चौ.मी. व पहिला मजला 219.96 चौ.मी.) फॅक्टरी शेड आणि 1000 चौ.मी. क्षेत्रफळाचा लीजहोल्ड प्लॉट क्र. एसबी-20.
राखीव किंमत : रु. 1,91,80,000 ईएमडी रक्कम : रु. 19,18,000, वेळ : दुपारी 12.30 ते 1.00

6. इतर अटी व शर्ती : अ) सदर मालमत्ता भारांसह, काही असल्यास, **जसे आहे जेथे आहे, जे आहे जे काही आहे आणि तेथे जे जे काही आहे** या तत्वार विकल्या जातील. ब) मालमत्ता राखीव किंमतीपेक्षा जास्त किमतीला विकल्या जातील. क) प्राधिकृत अधिकाऱ्यांची पूर्ववेळ घेऊन कोणत्याही कामाच्या दिवशी सकाळी 11.00 ते संध्या. 5.00 या कार्यालयीन वेळेत मालमत्तेची पाहणी करता येईल. ड) इच्छुक बोलीदारांनी मे. पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेड (इररपज्ञपर्शी.लो) पोर्टलच्या अनुसार राखीव किमतीच्या 10% दराने ई-वलेटमधील मुद्रा क्र. 5 अनुसार थेट बयाणा रक्कम ठेवीचा (ईएमडी) **28.04.2025** रोजी संध्या. 5.00 पर्यंत जमा करावी किंवा सदर चलनात दिलेल्या खाते तपशीलात आरटीजीएस/एनईएफटी द्वारे ईएमडी चलान तयार करून जमा करावी. बोलीदारांना अनु. क्र. 2 वरील मालमत्तेसाठी रु. **1,00,000.00** (रु. एक लाख फक्त) आणि अनु. क्र. 1 व 3 वरील मालमत्तांसाठी रु. **50,000.00 (रु. पन्नास हजार फक्त)** च्या पटीत त्यांच्या बोली वाढवता येतील. लिलाव/बोली फक्त ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक बिडींग द्वारे **29.04.2025** रोजी सकाळी **11.00** ते दुपारी **1.00** (**3** स्लॉट्स) या वेळेत **https://BAANKNET.COM** या संकेतस्थळावरून लावता येतील. इ) ईएमडी रकमेचा भरणा केल्यावर, इच्छुक बोलीदारांनी खालील कागदपत्रांच्या प्रती/ तपशील कॅनरा बँक, मडगाव शाखा यांचेकडे **28.04.2025** रोजी संध्या. **5.00** पर्यंत समक्ष वा **cb0314@canarabank.com** या ईमेलवर पाठवावा. **1)** ईएमडी रकमेपोटीचा डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर, जर आरटीजीएस/एनईएफटी द्वारे भरणा केला असल्यास यूटीआर क्र. सह पोचपावती. **2)** पॅनकार्ड, आयडी प्रूफ व पत्त्याचा पुरावायांच्या फोटो प्रती. तथापि, यशस्वी बोलीदाराने बोली रकमेच्या **25/%** रमकेचा भरणा जमा करतेवेळी बँकेला या कागदपत्रांच्या मूळ प्रती सादर कराव्यात. **3)** बोलीदाराचे नाव, संपर्क क्रमांक, पत्ता , ईमेल आयडी. **4)** ईएमडी रकमेचा परतावा करण्यासाठी बोलीदाराचा बँक तपशील. फ) सुरक्षित धनकोने विक्री संमत केल्यावर यशस्वी बोलीदीराचे नावे विक्री संमत केली जाईल. ग) त्याच्या/ तिच्या नावे विक्री संमत झाल्यावर यशस्वी बोलीदाराने बोली रकमेच्या **25%** (जमा केलेल्या ईएमडीसह) रक्कम त्वरित जमा करावी आणि उर्वरित रक्कम विक्री संमत झाल्यावर **15** दिवसांच्या आत जमा करावी. जर यशस्वी बोलीदारास वरील रकमेचा भरणा करण्यात अपयश आल्यास कोणतीही सूचना न देता प्राधिकृत अधिकारी वरील जमा केलेल्या रकमा जप्त करतील व मालमत्ता पुन्हा विक्रीस काढली जाईल. वरील सदर **25** रक्कम प्राधिकृत अधिकारी, कॅनरा बँक, मडगाव शाखा यांच्यानावे असलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे किंवा कॅनरा बँक, मडगाव शाखा खाते क्र. 209272434 आयएफएससी सीएनआरबी 0000314 मध्ये आरटीजीएस/एनईएफटी/फंड ट्रान्सफर द्वारे जमा करावी. ह) लागू हस्तांतरण, मुद्रांक व नोंदणी शुल्के असे सर्व खर्चाचा भार यशस्वी बोलीदाराने सोसावा. य) रु. **50.00 (रु. पन्नास लाख फक्त)** वरील सर्व विक्री साठी विक्री कितीच्या 1% दराने टीडीएस देय राहील. जो यशस्वी खरेदीदाराने स्वतंत्रपणे भारावा व त्याची मूळ पावती बँकेकडे जमा करावी. ज) मालमत्तेवरील हस्तांतरण, मुद्रांक/जीएसटी व नोंदणी जीएसटी, कर, स्थानिक स्व-प्रशासन देय (मालमत्ता कर, पाणी व सांडपाणी कर, वीज देयके, हस्तांतरण शुल्क इ.) चा खर्च यशस्वी बोलीदाराने सोसावा. झ) त्यासाठी कोणतेही कारण न देता लिलाव पुढे ढकलण्याचा-रद्द करण्याचा किंवा लिलावाच्या अटी व शर्ती बदलण्याचा अधिकार बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी राखून ठेवला आहे. ल) अधिक तपशीलासाठी कॅनरा बँक, मडगाव शाखेस कोणत्याही कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क करावा. संपर्क क्र. 0832-2703143. मोबा-7774005713 ईमेल आयडी **cb0314@canarabank.com**, किंवा सेवा पुरवठादार मे. पीएसबी अलायन्स **(Baanknet.com)** संपर्क तपशील : मेसर्स पीएसबी अलायन्स **(https://Baanknet.com)** दूर.क्र. **8291220220 ईमेल आयडी : support.Baanknet@psballiance.**लो म) जर बोलीदारांना इंटरनेटची सुविधा नाही परंतु ई-लिलावात भाग घ्यावयाचा असल्यास त्यांनी मंडल कार्यालय, पणजी किंवा मडगाव शाखेशी संपर्क करावा जे सुविधा केंद्र म्हणून आवश्यक व्यवस्था करतील.

दिनांक : 08.04.2025
ठिकाण : मडगाव

सही/-
प्राधिकृत अधिकारी
कॅनरा बँक

सावईवेरे हायस्कूलचा निकाल १०० टक्के

टीम दैनिक हेराल्ड

सावईवेरे, दि. ९ : येथील सरकारी हायस्कूलने आपल्या उज्वल निकालाची परंपरा कायम राखत या हायस्कूलचा दहावी परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. या विद्यालयाचा वर्षी ९५ टक्के तर त्याआधी आठ वर्षे १०० टक्के निकाल लागला होता. गेली काही वर्षे सातत्याने या हायस्कूलचा उत्तम निकाल लागत असल्याने पालक तसेच ग्रामस्थांनी हायस्कूलचे मुख्याध्यापक तसेच शिक्षक वर्गाचे कौतुक केले आहे.

यंदा या विद्यालयातून एकूण २३ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी ६ विद्यार्थी विशेष श्रेणीत, ८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. भार्गवी मोहन खेडेकर हिने ९०.१६ टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. भावना नारायण जांभूळकर हिने ८२.८३ टक्के गुण मिळवून विद्यालयात द्वितीय तर गौरांगी त्रिविक्रम नाईक हिने ७९.३३ टक्के गुण मिळवून विद्यालयात तृतीय, साक्षी विनय नाईक हिने ७८.८३ टक्के गुण मिळवून चौथा तर खुशी नाईक हिने ७८.५० टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक मिळविला.

यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक व शिक्षक वर्गाने अभिनंदन केले आहे.

OFFICE OF THE CIVIL REGISTRAR CUM SUB REGISTRAR AND SPECIAL NOTARY (EX- OFFICIO) OF TISWADI JUDICIAL DIVISION AT PANAJI, GOA
NO.CRSR/TISWADI/NOT/284 /2025
Dated: 01/04/2025

NOTICE

Shri. Manuel Vales, Joint Civil Registrar cum Sub Registrar and Special Notary (Ex-Officio) of Tiswadi Judicial Division at Panaji-Goa.

In accordance with the Section **346 (11) of "The Goa Succession Special Notaries and Inventory Proceeding Act, 2012"**, it is hereby made public that by a Notarial Deed of Succession dated 25th March, 2025 recorded before me in Book No, 768 of Notarial deeds at page 144 onwards the following is noted:-

That on 07/09/2013, died intestate Alexandra Maria Rodrigues at Goa Medical College, Bambolim-Goa and on 31/03/2023 died his wife Pedrinha Rosaria Fernandes at Panjim-Goa without leaving any will or testamentray disposition of their estate or of their last wish leaving behind them their two children as their sole legal heirs and Sucessors to his estate left behind (one) Mrs. Alrina Savita Rodrigues D/o late Alexandra Maria Rodrigues, aged 30 years, housewife, Portuguese National of Indian origin, married to Mr. Michael Simeone Nunes, aged 33 years, Service, Portuguese National of Indian Origin, R/0 H.No 518, Gods Gift, Hawai beach, Donapaula Nio, (two) Miss. Analee Sarisha Rodrigues D/o late Alexandra Maria Rodrigues, aged 20 years, student, unmarried, Portuguese National of Indian Origin, R/o H.No 41, Taleigao, Franzalem Morod, near Ideal High School, Caranzalem, North Goa that the parties of the first part have full knowledge of these facts and therefore the said parties of the first part hereby declared, Confirmed, and affirmed for all legal purposes that the aforesaid two daughters are the sole and universal heirs of the said deceased persons. And besides that there does not exist any other person or persons who according to the prevailing law in force in the State of Goa may have a legal right of Succession or would prefer in the said succession or would concur to the inheritance left behind by said deceased persons.

Any person having objection to this deed, may file in this Office within one month from the date of its publication.

Sd/- **(Manuel Vales)**
Special Notary (Ex-Officio), Tiswadi, Panaji- Goa
SEAL

विविधा विद्यालयाचा ८९.६५ टक्के निकाल

टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. ९ : न्हावेली - साखळी येथील विविधा उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावीचा निकाल ८९.६५ टक्के लागला. यामध्ये वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के लागला. ४९ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यातील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यात ५ विशेष श्रेणीत व २४ प्रथम श्रेणीत, विज्ञान शाखेचा ९८ टक्के लागला. ५२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते, त्यातील ५१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यात १२ विशेष श्रेणीत व २७ प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. कला शाखेचा ८४ टक्के लागला. ३८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ३२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ४ विशेष श्रेणीत व १४ प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले व व्यावसायिक शाखेचा निकाल ६८.५७ टक्के लागला.३५ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी २४ उत्तीर्ण झाले. यात ४ विशेष श्रेणीत व ११ प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले.

कला शाखेत पहिले तीन क्रमांक अनुक्रमे दीक्षा नाईक, आयुषी घाडी व तनीक्षा मळीक, वाणिज्य शाखेत दीपाली ननावरे,कुशल मळीक व गौरी धाकुरकर,विज्ञान शाखेत लक्षिता मळीक, प्रवीण पंचांगे व रुची न्हावेलकर,ओ.एम.शाखेत रघुनाथ गाडगीळ,पुष्पराज गावकर व रश्मी परब, ए.ई.टी. शाखेत सोहम नाईक, रब्बानी सुंकड व राजकुमार हडगळी, एचसीएस शाखेत दिव्या भोसले, गुंजन तळवडेकर, दर्शन परब यांनी अनुक्रमे पहिले तीन क्रमांक पटकावले.

विद्यार्थ्यांनी समजून घेतला पॉश कायदा

टीम दैनिक हेराल्ड

पर्वरी, दि. ९ : कला, विज्ञान आणि वाणिज्य सरकारी महाविद्यालय साखळी येथील अंर्तगत तक्रार समिती आणि महाविद्यालयीन समुपदेशन आणि मूल्य शिक्षण कक्षाने महाविद्यालयाच्या सभागृहात पॉश कायदा (कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक) या विषयावर व्ही.एम.साळगावकर महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक ॲड रेश्मी सावंत यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आलेले होते. महिलांचे संरक्षण आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षित शैक्षणिक वातावरण सुनिश्चित करून त्यासंदर्भात विद्यार्थी व कर्मचाऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण करणे हा हेतू हे व्याख्यान आयोजित करण्यामागचा होता. उपप्राचार्य रोझालिना डिसिल्वा यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

ॲड. रेश्मी सावंत यांनी आपल्या व्याख्यानात पॉश कायदा २०१३ तील प्रमुख बाबी उलगडून सांगितल्या. ज्यामध्ये शैक्षणिक संस्थांमधील त्याची प्रासंगिकता, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या आणि तक्रारी हाताळण्यात अंतर्गत तक्रार समितीची भूमिका इत्यादी बाबी उलगडून सांगितल्या.

लैंगिक छळ म्हणजे काय, छळ म्हणून पात्र ठरणाऱ्या कृती, स्वीकारार्ह आणि अयोग्य वर्तनातील फरक यांसारख्या मुद्द्यांचा परामर्श घेताना ॲड रेश्मी सावंत यांनी केस स्टडीज स